# मेट्रो-३ मध्ये प्रवाशांना वाय-फाय सुविधा मिळणार

## बोगद्यातही अखंडित इंटरनेट सेवा

मुंबई, ता. २७ : मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रो-३ च्या पहिल्या टप्प्यातील कामे प्रगतिपथावर आहेत. प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा आणि विनाविलंब सेवा देण्याच्या दृष्टिकोनातून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून विविध उपाययोजनांवर काम सुरू आहे. यातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे या प्रवासात प्रवाशांना अखंडित इंटरनेट आणि मोबाईल सुविधा देण्यासाठी मेट्रोने कंत्राटदाराची नेमणूक केली आहे.

मेट्रो-३ला दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान करण्याकरिता दूरसंचार सुविधेसंदर्भात इन-बिल्डिंग सोल्यूशन्ससाठीचे कंत्राट दिले. हे कंत्राट सौदी अरेबियामधील एसीईएस या कंपनीच्या 'एसीईएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या उपकंपनीला निविदा प्रक्रियाद्वारे देण्यात आले आहे. संबंधित कंपनीने बंगळुरू विमानतळ आणि सूरत डायमंड बोर्स येथे मोबाईल व इंटरनेट सेवा प्रदान केली आहे. यासाठी मिळालेला प्रतिस्टेशन परवाना शुल्क भारतातील इतर कोणत्याही मेट्रो मार्गाच्या तुलनेत अंदाजे २.५ पट इतका जास्त आहे. यासोबतच ॲक्वालाईन मार्गातील प्रवासात अखंडित मोबाईल आणि इंटरनेट सेवा प्रवाशांना मिळणार आहे.

मुंबई मेट्रो-३ मार्ग संपूर्णपणे भूमिगत असल्याने स्थानकातील तिकीट खिडकी जमिनीच्या खाली १०.१४ मीटर, तर फलाट जमिनीच्या खाली १८-२० मीटर खोल आहेत. त्यामुळे भुयारी मार्गात मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा उपलब्ध करणे हे या प्रकल्पातील एक महत्त्वाचे आव्हान आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, तसेच प्रवासादरम्यान प्रवाशांना अखंडित मोबाईल आणि इंटरनेट सेवा सुनिश्चित करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने जिओ, वोडाफोन, एअरटेल आणि एमटीएनएलसारख्या मोबाईल सेवा प्रदात्यांकडून सेल्युलर कव्हरेज उपलब्ध करण्याची योजना आखली आहे. इन-बिल्डिंग सोल्यूशन्सद्वारे भुयारी मार्गातील स्थानके आणि बोगद्यांमध्ये अँटेना आणि रिपीटर्स बसवून हे साध्य केले जाईल. मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे संचालक (नियोजन आणि रिअल इस्टेट डेव्हलपमेंट) आर. रमणा यांनी बिल्डिंग सोल्यूशन्ससाठी देशातील आजपर्यंतचा सर्वाधिक वार्षिक प्रीमियम प्राप्त केल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.



मेट्रो-३ मार्गाद्वारे या उपक्रमातून तिकीट दराव्यतिरिक्त सर्वाधिक महसूल प्राप्त होणार आहे. नॉन-फेअर बॉक्स, इन-बिल्डिंग सोल्युशन्सद्वारे प्रवाशांना भूमिगत मेट्रो-३ मार्गातील प्रवासादरम्यान अखंडित मोबाईल आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा आनंद घेता येईल.

**- अश्विनी भिडे,** व्यवस्थापकीय संचालक, रेल्वे कॉर्पोरेशन